# कार्यालय नगर परिषद, ब्रम्हपुरी (जिल्हा-चंद्रपूर)

MUNICIPAL COUNCIL, BRAMHAPURI DIST. CHANDRAPUR-441206

Email - conagarparishad@gmail.com Phone. 07177-272013
webmail - coud.brahmpuri.maharashtra.gov.in

क्रमांक : कावि/नपब्र/बांध./2026/ -4 दिनांक :- 15 / 05 / 2026

## ई- निवीदा सुचना (तिसरी वेळ )

मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपुरी जिल्हा-चंद्रपूर यांचे वतीने **न.प.निधी अंतर्गत सन 2026-27** अंतर्गत खालील कामाच्या बि-1 दोन लिफाफा ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक /05/2026 ला दुपारी 12 - 00 वाजता पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | निविदेस पात्र अंदाजपत्रकिय रक्कम रुपये | अनामत रक्कम रुपये | कामाचा कालावधी | निविदा प्रपत्र किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. |
| 1. | नगर परिषद क्षेत्रातील प्रभाग.क्र.1 ते 5 मधिल रु. 50,000/-चे आतील फुटकळ स्वरुपाची कामे करणे करीता एजंन्सी नियुक्ती करणे सन 2026-27 करीता (भाग-1) | 50,000/- | 5000/- | 1 वर्ष | 1000/- | वर्ग 9 व त्यावरील |
| | नगर परिषद क्षेत्रातील प्रभाग.क्र.6 ते 11 मधिल रु. 50,000/-चे आतील फुटकळ स्वरुपाची कामे करणे करीता एजंन्सी नियुक्ती करणे सन 2026-27 करीता (भाग-2) | 50,000/- | 5000/- | 1 वर्ष | 1000/- | वर्ग 9 व त्यावरील |

| ई-निविदा प्रसिध्दीचा तपशिल | |
|---|---|
| ऑनलाईन निविदा विक्री व स्विकृती दिनांक | दिनांक:- 16/05/42026 ला दुपारी 12– 00 वाजेपासून ते दिनांक 23/05/2026 ला दुपारी 03 – 00 वाजेपर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे दिनांक | दिनांक :- 25/05/2026 ला दुपारी 04 – 00 वाजता शक्य झाल्यास. |

**अटी व शर्ती -:**

1) निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल.
2) निविदेची पुढील सर्व कार्यवाही व शुध्दीपत्रे महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवरच उपलब्ध राहतील.
3) निविदाधारकाने निविदा सादर करतेवेळे संपुर्ण कागदपत्रे पिडीएफ स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे.
4) कंत्राटदार संगणक प्रणालीवर ई-निविदा भरतांना आयकर क्लीअरन्स प्रमाणपत्र (सन 2020-21, 2021-22, 2022-23, 2023-24 2024-25, किंवा नोंदणी वर्षापासुनचे), पॅनकार्ड, जि.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, ई.पी.एफ. प्रमाणपत्र, सार्वजनिक बांधकाम विभागाचे पंजीकरण प्रमाणपत्र, व्यवसाय कर क्लियरंस प्रमाणपत्र (सन 2025-26), व पंजीकरण प्रमाणपत्र संविदेमध्ये पदाधिकाऱ्यांचा सहभाग नसल्याबाबतचा परिशिष्ट अ प्रमाणे १००/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र, ई-निविदेत जोडलेले सर्व कागदपत्रे खरे असल्याबाबत प्रतिज्ञापत्र रु. ५००/-

Scanned with CamScanner

स्टॅम्पपेपर वर शासनाचे कोणत्याही विभागात काळ्या यादीत नाव सामाविष्ट नसलेबाबत स्वयोंघोषणापत्र रुपये १००/-
स्टॅम्पपेपर वर इत्यादी कागदपत्रे मुळप्रतीवरुन स्कॅनिंग करुन लिफापा नं. १ मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.
तसेच विशिष्ट निविदेनुसार कंत्राटदाराकडे उपलब्ध यंत्र सामुग्रीचा तपशिल कंत्राटदाराकडे उपलब्ध तांत्रिक
मनुष्यबळ उपलब्धतेचा तपशील शासकिय विभागाचे बांधकाम संबंधीत कंत्राट पार पाडले असल्याचे अनुभव
प्रमाणपत्र अथवा वर्कडन-वर्क इन हॅन्ड प्रमाणपत्र (कमीत कमी 3 महिन्यापूर्वी अद्यावत केलेले असणे अपेक्षित
आहे). निविदेमधील तांत्रिक लिफाफ्यामधे पात्र असलेल्या उमेदवाराचे आर्थीक लिफापा उघडण्यात येईल.

5) न.प.कार्यालयात कोणत्याही निविदा फार्म/PDF स्वरुपात कागदपत्रे /निविदा अर्ज /निविदा किंमत/इसारा/रक्कमेची डि.डी.स्विकारल्या जाणार नाही.

6) निविदा फार्म किमत व इसारा रक्कम ही ऑनलाईन नेट बँकींग (S.B.I.) द्वारेच जमा केल्या जाईल किंवा http://mahatenders.gov.in ह्या वेबसाईटच्या पोर्टल सुविधाद्वारे चालान तयार करुन कोणत्या राष्ट्रीयकृत बँकेतुन जमा करण्यात यावे.

7) करारपत्र करतेवेळी अनामत रक्कम 1 % रोखीने भरणा करावा लागेल.

8) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद,ब्रम्हपुरी यांनी राखुन ठेवलेला आहे.

9) दिनांक 1 जुलै 2017 पासुन देण्यात येणाऱ्या विविध शासकीय कंत्राटावर GST अधिनियमानुसार कराची आकारणी होणार आहे.त्यामुळे लागु झालेल्या GST च्या कराचा बोजाचा विचार करुन निविदा सादर कराव्यात.

10) सार्वजनिक बांधकाम विभागाचे B-1 मधील सर्व निविदा शर्ती व अटी निविदाधारकास बंधनकारक राहील.

11) निविदा प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा निविदा मंजुरी नंतर कामाच्या कोणत्याही टप्प्यावर कागदपत्राच्या विधिग्राह्यतेबाबत आक्षेप नोंदविल्या गेल्यास सदरची बाब कायदेशीर/फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील व काम रद्द करण्यास व वसुलीस व जप्तीस पात्र राहील.

12) ई-निविदा सुचनेत दर्शविण्यात आलेल्या कंत्राटी कामाचे मंजुर निविदाधारकास कामाचे कंत्राट रक्कम अनुक्रमे रुपये 5 लक्ष किंमती पर्यंत करीता कार्यकरार (करारनामा) शासकिय मुद्रांक रुपये 500/- व 5 लक्ष रुपये पेक्षा वरील प्रत्येकी 1 लक्ष रुपये किंमतीसाठी किंवा त्याच्या भागासाठी 0.3% असे प्रमाणात आकारण्यात येईल.

13) कामासाठी महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2013 चे तरतुदी बंधनकारक राहतील.

14) देयक अदा करतांना रॉयल्टीबाबतचे /गौणखनीज वाहतुक परवाने /अधिकृत कागदपत्रे कंत्राटदार सादर करून खात्री पटवुन देईल यामध्ये कसुर केल्यास रुपये 600/- प्रती ब्रास याप्रमाणे / शासन निर्णया नुसार रॉयल्टी चॉजेस आकारणी करुन बिल रकमेतुन कपातीस पात्र राहिल. याबर कंत्राटदाराचा कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

15) अंतिमरित्या पुर्ण झालेल्या कामाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या नंतर आणि कामाच्या देयकाची अदायगी कार्यवाही नंतर सदर कामाचा दोष दायीत्व निवारण कालावधी पुर्ण झाल्यानंतरच करार समाप्ती झाल्याचे मानण्यात येईल.

16) सदर कामाची सुरक्षा ठेव रक्कम शासन परीपत्रक क्र.सीएटी-2017/प्र क्र 8/इमा-2 दिनांक 19/01/2019 नुसार किंवा सदर कामाचे लेखापरीक्षण यापैकी जे नंतर होईल त्यास अनुसरुन परत करण्यात येईल याबाबतीत मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल

17) कंत्राटदाराने EPF चे रजिस्ट्रेशन जोडणे आवश्यक आहे.त्याशिवाय निविदा उघडता येणार नाही.

18) प्रचलीत किमान वेतन कायदा 1984 व इतर कामगार कायद्याने पालन करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहिल तसेच मा.महा.आयुक्त भविष्य निर्वाह निधी नागपुर यांचे कडे पंजीयन प्राप्त करुन तत्संबधातील EPF पंजीयन क्रमांक सादर करणे आवश्यक राहिल.

Scanned with CamScanner

19) नोंदणीकृत कंत्राटदारांनी अधिकृत डी एस सी प्राप्त करुन घवून महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन केवळ ई-निवीदा पद्धतीनेच सादर करावी.

20) आदेश मिळालेपासुन विहीत मुदतीचे आत काम पुर्ण करण्याची जबाबदारी करारनामा लिहुन देणार म्हणजेच कंत्राटदाराची राहिल.

21) कामाचे निधी उपलब्धतेनुसार बिल शोधन कार्यवाही करण्यात येईल.

22) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद,ब्रम्हपुरी यांनी राखुन ठेवलेला आहे.

23) निविदेतील भाग १ व भाग २ क्षेत्राकरिता २ स्वतंत्र कंत्राटदार यांची नेमणूक करण्यात येईल व दोन्ही पैकी प्राप्त कमी दारा प्रमाणे दोन्ही कंत्राटदारास काम करणे बंधनकारक राहील.

कार्यालय, नगर परिषद ब्रम्हपुरी

(डॉ. माधुरी बा. सलामे )
मुख्याधिकारी
नगर परिषद, ब्रम्हपुरी

Signature Not Verified
Digitally signed by Madhuri Baburao Salame
Date: 2026.05.15 18:05:22 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with CamScanner